निशाणी क्रमांक **४३/(ब)** दीर्घ वाद **'एल्'**
(दिवाणी नियमावली प्रकरण ९ परिच्छेद **२२३**)

**वाद मुद्दे**

(दिवाणी प्रक्रिया संहिता, **१९०८** चा क्रम **१४** नियम **२ व ३**)

(सीएनआर क्रमांक एम्. एच्.आर.जी. ०९०००४७१२०१६)

**०१**. प्रतिवादी क्रमांक ०३ आणि ०४ हे मौजे वरसे तालुका रोहा येथील सर्व्हे क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०९, क्षेत्र २६ गुंठे आणि सर्व्हे क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०१, क्षेत्र २६ गुंठे या जमीन मिळकती त्यांच्या कुटुंबाच्या दोन भिन्न मिळकती आहेत असे सिद्ध करतात काय?

**०२**. प्रतिवादींनी मौजे वरसे येथील वाद मिळकत सर्व्हे क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०९, क्षेत्र २६ गुंठे याची ति-हाईतांना विक्री अथवा हस्तांतरण करू नये असा कायम मनाई आदेश मिळण्यास वादी पात्र आहे असे सिद्ध करतो काय?

**०३**. वादी मौजे वरसे तालुका रोहा येथील सर्व्हे क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०९, क्षेत्र २६ गुंठे आणि सर्व्हे क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०१, क्षेत्र २६ गुंठे ही एकच मिळकत आहे असा जाहीर ठराव होवून मिळण्यास पात्र आहे असे सिद्ध करतो काय?

**०४**. प्रतिवादी क्रमांक ०२ ते ०४ यांनी प्रतिवादी क्रमांक ०१ च्या हक्कात दिनांक ०८.०६.२००९ रोजी करून दिलेला दस्त नोंदणी क्रमांक १७०८/२००९ हा खरेदी दस्त अवैध आणि शून्यकरणीय आहे असा जाहीर ठराव होवून मिळण्यास वादी पात्र आहे काय?

**०५.** वादी त्याने मागणी केलेले अनुतोष मिळण्यास पात्र आहे काय?

**०६.** अंतिम आदेश, हुकूमनामा व खर्चाबाबत आदेश काय?

**---स्वाक्षरी---**
**(सुभाष ल. फुले)**
**(एम् एच आर जी ०००९ - २१२५)**
**ठिकाण : रोहा.** **दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रोहा.**
**दिनांक : ११.०२.२०१९.** **जिल्हा रायगड.**

टीप : **०१**. पटल लिपीकाने उभय पक्षांच्या विधीज्ञांकडून वाद मुद्यांची नोंद सही व तारखेसह करून घ्यावी.

**०२**. वादी व प्रतिवादीने पुढील तारखेला दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम १६ नियम ०१ नुसार ते तपासणार असतील अशा प्रस्तावीत साक्षीदारांची यादी दाखल करावी.

**०३**. वादी व प्रतिवादीने पुढील तारखेला साक्षीदारांची यादी सादर न केल्यास त्यांना स्वत: व्यतीरीक्त अन्य साक्षीदार तपासायचे नाहीत असे गृहीत धरले जाईल व पुढील आदेश पारीत केला जाईल.